**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५४/२०२१</u>**
**<u>CNR No. MHSO060007352021</u>**

बाळू मोरे

वि.

ग्रामपंचायत, चळे वगैरे

## <u>आदेश निशाणी क्र. ३८ वर</u>

०१. सोबतच्या यादीप्रमाणे महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यास वादी यांनी परवानगी मागितली आहे. त्यावर प्रतिवादी यांनी आक्षेप नोंदवला आहे. अर्ज खरा व बरोबर नाही. सोबतच्या यादीप्रमाणे वादी हे झेरॉक्स प्रत दाखल करत आहेत. त्यावर आवश्यक कार्यालयाचा शिक्का नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे प्रतिवादी यांनी नमूद केले.

०२. अर्जासोबत यादीप्रमाणे वादी हे पोलीस अधिक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण येथील सशुल्क पोलीस संरक्षण पुरवणेबाबतचा आदेशाची झेरॉक्स प्रत दाखल करत आहेत. वादविषयाचे निराकरण होण्यासाठी सदर कागदपत्र आवश्यक आहे असे वादी यांनी सांगितले. त्याचे कायदेशीर वैधतेबाबतचा निर्णय त्याबाबत युक्तीवादाचे नंतर घेता येईल. आता केवळ प्रस्तुत कागदपत्र दाखल करण्यास परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य राहील. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्रे दाखल करण्यास वादी यांना परवानगी देण्यात येत आहे.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.01.13 17:58:51 +0530

दि. १३/०१/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 13/01/2022 |
| Order uploaded on | : | 13/01/2022 |